जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९६ दिनांक - ०६/०२/२०२४**

खडकी पोलीस ठाणे पुणे शहर

**लोहमार्ग पोलीस भरती करीता बनवाट सर्टिफिकेट देणारा आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, खडकी पुणे यांनी सुनावली शिक्षा.**

दि.०५/०२/२०२४ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, खडकी न्यायालय,खडकी पुणे यांनी खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २५/२०१६ भा.द.वि.कलम. ४२०,४६५,४६८,४७१ मधील **आरोपी नामे सागर लालसिंग राठोड, वय ३१ वर्षे, रा.जयसिंगपुर,ता.शिरोळ,जि.कोल्हापुर,** यास मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, खडकी कोर्ट पुणे यांनी भा.द.वि.कलम. ४२० अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावास व २०००/- रु दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास, २) भा.द.वि.कलम. ४७१ प्रमाणे ०२ वर्षे, सश्रम कारावास व २०००/- रु दंड व दंड न भरल्यास ०१ महिना कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास सहा पोलीस निरीक्षक उमाजी राठोड, तत्कालीन नेमणुक खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर यांनी केलेला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-४, पुणे शहर श्री विजयकुमार मगर, मा. सहा. पोलीस आयुक्त खडकी विभाग, श्रीमती आरती बनसोडे, खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गिरीशकुमार दिघावकर, यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्टाचे कामकाज पाहणारे, पोलीस अंमलदार गणेश मुथय्या, सिध्दार्थ खंदारे, हरिभाऊ लोहकरे यांनी साक्षीदार, पुरावे मा. न्यायालयात हजर करणेकामी विशेष मेहनत घेतली आहे. सदर कोर्ट केस कामी सरकारी वकील म्हणुन श्रीमती बकाल मॅडम यांनी कामकाज पाहिले आहे.